दैनिक **महावृत्त**

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



संजय साबळे 8208137064 / 9921661173

विकी साबळे 8208068315

प्रिती नर्सरी अँन्ड लॉन सप्लायर्स

आमच्याकडे सर्व प्रकारचे शोभीवंत इनडोअर आऊटडोअर प्लॅन्टस तसेच लॉन मिळेल

पुणे - सोलापुर रोड, काळभोर लॉन्सच्यापाठीमागे, कवडीगाव रोड, ता. हवेली, जि. पुणे.



लातूर वर्ष ४ थे अंक ३०४ मंगळवार दि.०३ जून २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# शिक्षक भरती घोटाळ्याची न्यायालयीन चौकशी व्हावी - अनिल देशमुख

नागपूर - शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघात अनेक शाळांमध्ये नियमबाह्य पद्धतीने अनेक बोगस तुकड्यांना मंजुरी देण्यात आली आहे. याबाबत न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शरद पवार पक्षाचे नेते आणि माजी मंत्री अनिल देशमुख यांनी केली.


राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघात अनेक शाळांमध्ये नियमबाह्य पद्धतीने अनेक बोगस तुकड्यांना मंजुरी दिली आहे. त्या आधारावर बॅक डेटमध्ये बोगस शिक्षक भरती केल्यासंदर्भात हे आरोप होत आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी अनिल देशमुख यांनी केली आहे. अनिल देशमुख म्हणाले, शिक्षक भरती घोटाळा फक्त नागपूर जिल्हा पुरता मर्यादित नसून राज्यात अनेक ठिकाणी हा घोटाळा झाला आहे. राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघातही हा घोटाळा झाला आहे. २०१५ पासून नव्या तुकड्यांना मान्यता देण्यात येऊ नये असे असताना, दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघात अनेक शाळांमध्ये बॅक डेटमध्ये तुकड्यांना मान्यता देऊन शंभर शिक्षकांची



बॅक डेटमध्ये नेमणूक केली आहे. एक एक शिक्षक दोन शाळेत नोकरीवर दिसून येत आहे. अल्पसंख्याक संस्थांच्या शाळांमध्ये हा प्रकार जास्त दिसून येत असल्याचे अनिल देशमुख म्हणाले. शिक्षण मंत्रांच्या मतदारसंघात एवढ्या मोठ्या प्रमाणात बोगस तुकड्यांना नियमबाह्य पद्धतीने मान्यता देऊन बोगस शिक्षक भरती होत असेल, तर राज्यभरातील शिक्षक भरती घोटाळ्याची चौकशी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या माध्यमातून करण्यात यावी, अशी माझी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे मागणी करणार आहे असे देशमुख म्हणाले. नागपूर जिल्ह्यातील बोगस शिक्षक घोटाळा संदर्भात एसआयटीची निर्मिती करण्यात आली असून ती एसआयटी सध्या चौकशी करत आहे.

# बोगस तुकड्यांना नियमबाह्य मान्यता

नागपूर : प्रतिनिधी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघात अनेक शाळांमध्ये नियमबा पद्धतीने अनेक बोगस तुकड्यांना मंजुरी दिली असल्याचे मत शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी व्यक्त केले.



दरम्यान, राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघात अनेक शाळांमध्ये नियमबा पद्धतीने अनेक बोगस तुकड्यांना मंजुरी दिली आहे. त्या आधारावर बॅक डेटमध्ये बोगस शिक्षक भरती केल्या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाने मोठा आरोप केला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अनिल देशमुख यांनी केली आहे.

शिक्षक भरती घोटाळा फक्त नागपूर जिल्हा पुरता मर्यादित नसून राज्यात अनेक ठिकाणी हा घोटाळा झाला असल्याचे अनिल देशमुख म्हणाले. राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघातही हा घोटाळा झाला आहे. २०१५ पासून नव्या तुकड्यांना मान्यता देण्यात येऊ नये असे असताना शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघात अनेक शाळांमध्ये बॅक डेटमध्ये तुकड्यांना मान्यता देऊन शंभर शिक्षकांची बॅक डेटमध्ये नेमणूक केली आहे. एक एक शिक्षक दोन शाळेत नोकरीवर दिसून येत आहे. अल्पसंख्याक संस्थांच्या शाळांमध्ये हा प्रकार जास्त दिसून येत असल्याचे अनिल देशमुख म्हणाले.

शिक्षण मंत्रांच्या मतदारसंघात एवढ्या मोठ्या प्रमाणात बोगस तुकड्यांना नियमबा पद्धतीने मान्यता देऊन बोगस शिक्षक भरती होत असेल, तर राज्यभरातील शिक्षक भरती घोटाळ्याची चौकशी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या माध्यमातून करण्यात यावी, अशी माझी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे मागणी करणार आहे असे देशमुख म्हणाले.नागपूर जिल्ह्यातील बोगस शिक्षक घोटाळा संदर्भात एसआयटीची निर्मिती करण्यात आली असून ती एस आय टी सध्या चौकशी करत आहे. मात्र राज्यसाठीची चौकशी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या मार्फत करावी अशी मागणी आहे. शिक्षण मंत्र्यांच्या मतदारसंघात एवढा मोठा घोटाळा होत असेल तर त्याची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे असे देशमुख म्हणाले. बोगस शिक्षक भरती घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी आमची मागणी आहे सरकारला विनंती करत आहोत पुढेही विनंती करू नाहीतर न्यायालयात जाण्याचा मार्ग मोकळा आहे असे देशमुख म्हणाले. शेतकरी कर्जमाफीची वाट पाहतायेत शेतक-यांच्या कर्जमाफीच्या बाबतीत राज्य शासन एक शब्द सुद्धा बोलायला तयार नाही. देवेंद्र फडणवीस सातबारा कोरा करु असे म्हणायचे.

# एसटीची पुरुषांसाठी ‘लवचिक भाडे’ योजना

मुंबई : प्रतिनिधी एसटीच्या प्रवासात आता पुरूषांनाही विशेष सवलत मिळणार आहे, याबाबतची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. यासाठी एसटी महामंडळ प्रवाशांसाठी ‘लवचिक भाडे’ (फ्लेक्सी भाडे) योजना सुरू करणार आहे. याचा अर्थ कमी गर्दीच्या महिन्यांत प्रवाशांची संख्या वाढवण्यासाठी तिकिटांचे दर सुमारे १५% कमी केले जातील. एसटी महामंडळाकडून रविवारी, १ जून रोजी ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त यशवंत नाट्य मंदिर येथे आयोजित केलेल्या नाविन्यपूर्ण योजनांचा शुभारंभ आणि गौरव पुरस्कार सोहळ्यानिमित्त राज्य परिवहन (एसटी) बसेसमध्ये प्रवास करणा-या प्रवाशांना कमी गर्दीत कमी भाडे देण्याची संधी मिळणार आहे.

# सण, उत्सव साजरे करताना नियमांचे पालन करावे- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे




लातूर :- आपला लातूर जिल्हा हा शांतताप्रिय आहे. आजपर्यंत सर्वधर्मीय सण, जयंती उत्सव शांततेत साजरे करण्याची जिल्ह्याची गौरवशाली परंपरा आहे. ही परंपरा जपण्यासाठी सर्वांनी सण, उत्सव साजरे करताना नियमांचे पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आयोजित शांतता समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या.

अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, पोलीस उपाधीक्षक गजानन भातलवंडे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशीषकुमार अय्यर, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे, लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, नगरपालिका प्रशासनचे सहआयुक्त मंगेश शिंदे, पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्यासह निमंत्रित सदस्यांची यावेळी उपस्थिती होती.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे. महानगरपालिका व नगरपालिका यांनी परवानगी दिलेल्या तात्पुरत्या कत्तलखान्याशिवाय इतर कुठेही जनावरांची कत्तल करू नये. तसेच गोवंश हत्या बंदीचे काटेकोरपणे पालन केले जावे. प्रत्येक कत्तलखाण्याच्या ठिकाणी पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी नियुक्त करण्यात येणार असून जिल्हा प्रशासनामार्फत देण्यात येणाऱ्या सूचनांचे सर्वांनी पालन करावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या. महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या कत्तलखान्यांची यादी सर्वत्र प्रसिद्ध करावी, असे त्यांनी सांगितले.

जनावरांची वाहतूक करताना नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र प्राणी रक्षण कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी पोलीस, पशुसंवर्धन विभाग आणि परिवहन विभागाने समन्वयाने काम करावे, असे अपर जिल्हाधिकारी श्रीमती करमरकर म्हणाल्या.

प्रारंभी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. शिंदे यांनी महाराष्ट्र प्राणी रक्षण कायद्यातील विविध तरतुदींची माहिती दिली. तसेच बकरी ईदच्या अनुषंगाने प्रशासनामार्फत करण्यात आलेल्या तयारीबाबत माहिती दिली.

# दिल्ली येथे झालेल्या स्टेअर्स च्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे घवघवीत यश महाराष्ट्राने मिळवले कराटे मध्ये पहिले स्थान

लातूर :- दिल्ली येथे झालेल्या स्टेअर्स च्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे घवघवीत यश महाराष्ट्राने मिळवले कराटे मध्ये पहिले स्थान. युवा कार्यक्रम, खेल मंत्रालय भारत सरकार , तसेच राष्ट्रीय खेल सवर्धन संस्था ची मान्यता असलेल्या स्टेअर्स फाउंडेशन च्या राष्ट्रीय स्पर्धेचे उदघाटन तालकटोरा स्टेडियम दिल्ली येथे






या स्पर्धेचे उदघाटन पूर्व खेल मंत्री भारत सरकार मा.श्री.विजय गोयल यांच्या हस्ते झाले, रक्षा राज्य मंत्री, भारत सरकार मा.श्री. संजय शेठ यांनी विडिओ द्वारे संबोधन केले.

तसेच इंडियन ऑलिम्पिक च्या अध्यक्ष मा. पी टी उषा यांनी विडिओ द्वारे संबोधन केले.

तसेच उदघाटन प्रसंगी स्टेअर्स चे संस्थापक मा. श्री.सिद्धार्थ उपाध्याय ,

स्पर्धाप्रमुख मा. श्री.पारस मिश्रा हे उपस्थित होते

तर या स्पर्धा त्यागराज स्टेडियम दिल्ली येथे संपन्न झाल्या

या स्टेअर्स च्या राष्ट्रीय कराटे स्पर्धे ला संपूर्ण भारतातून साधारण १६ राज्यातून खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला.

ही राष्ट्रीय कराटे स्पर्धा काता व कुमिते या दोन्ही प्रकारे घेण्यात आली ,

ही स्पर्धा दिल्ली या ठिकाणी १९ ते २२ मे २०२५ रोजी संपन्न झाली.

या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत महाराष्ट्रातून ७० खेळाडूंनी सहभाग घेतला.

त्यामध्ये महाराष्ट्रातील कराटे खेळाडूंनी नेत्र दीपक कामगिरी करून आपले कौशल्य दाखवले व महाराष्ट्राला सर्वात जास्त गोल्ड मेडल मिळवून देऊन महाराष्ट्राला पहिले स्थान मिळवून दिले. यात मुंबई विभागाने सर्वात जास्त सुवर्णपदक घेतले त्या खालोखाल मराठवाडा विभाग व विदर्भ विभागाने सुवर्णपदक घेऊन महाराष्ट्राची मान उंचावली,

त्याबद्दल, स्टेअर्स महाराष्ट्र कराटे टूर्नामेंट चेअरमन

क्योशी राजकपूर बागडी सर,

स्टेअर्स महाराष्ट्र कराटे प्रमुख शिहान विशाल जाधव सर ,

स्टेअर्स चे महाराष्ट्राचे टूर्नामेंट टेक्निकल डायरेक्टर शिहाण गणेश मंगल गिरी सर,

यांनी

स्टेअर्स महाराष्ट्र कराटे टीम व प्रशिक्षक यांचे कौतुक व अभिनंदन केले

प्रशिक्षक बालाजी गिरी, परभणी.

प्रशिक्षक देविदास माने, सातारा.

प्रशिक्षक सुजित पत्रे, यवतमाळ.

प्रशिक्षक लता बारपात्रे, चंद्रपूर.

प्रशिक्षक मंगेश दिमटे, ठाणे.

प्रशिक्षक मुक्ताई जाधव, मुंबई उपनगर.

प्रशिक्षक झेन कंबाता, मुंबई सिटी

प्रशिक्षक कल्पेश शिंदे, रायगड.

प्रशिक्षक निलेश सोनवणे, जळगाव.

या प्रशिक्षकांचे विजयी खेळाडूंना मार्गदर्शन लाभले,

तसेच खासदार मा. श्री.संजय दिना पाटील व मा.रजोल संजय पाटील यांनी देखील स्टेअर्स महाराष्ट्र कराटे, स्टेअर्स महाराष्ट्र कराटे टीम व प्रशिक्षक त्यांचे कौतुक व अभिनंदन केले

संपूर्ण महाराष्ट्रात सर्व स्थरातून स्टेअर्स महाराष्ट्र कराटे , विजय खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे कौतुक केले जात आहे, त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे

# डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांना जीवे मारण्याची धमकी - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा तीव्र निषेध

मुंबई / प्रतिनीधी :- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे डिजिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष आणि दैनिक जनप्रवासचे संपादक सिद्धार्थ भोकरे यांना अज्ञात इसमाने निनावी पत्राद्वारे जीवे मारण्याची धमकी दिली आहे. हा प्रकार १५ मे २०२५ रोजी उघडकीस आला, जेव्हा भोकरे यांनी भारतातील अभिनय क्षेत्रातील देशभक्तीवर एक परखड आणि जबाबदार मत व्यक्त केले होते.

घडलेल्या घटनेचा तपशील: सिद्धार्थ भोकरे यांनी १५ मे २०२५ रोजी एक लेख लिहिला, ज्यामध्ये त्यांनी पाकिस्तानी अभिनेत्यांचे भारतासंबंधी असलेले सन्मान आणि अभिमान लक्षात घेतला. त्यात त्यांनी भारतीय अभिनेत्यांना आपल्या देशाबद्दल अभिमान व्यक्त करण्याची आवश्यकता व्यक्त केली होती. त्यांचे मत हे स्पष्ट होते की, भारतीय अभिनेत्यांनी पाकिस्तानच्या निषेधात उभे राहावे आणि भारताचा गौरव वाढवावा.

भोकरे यांच्या या स्पष्ट मतावर आधारित एका अज्ञात इसमाने त्यांना धमकीचे पत्र पाठवले. या पत्रात भोकरे यांना धमकावले गेले की, तुम्ही खान बंधूंची माफी मागितली नाही तर तुम्हाला उडवून टाकले जाईल.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा निषेध: महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने याच्या विरोधात तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस, डॉ. विश्वासराव आरोटे यांनी राज्य सरकारकडे मागणी केली आहे की, सिद्धार्थ भोकरे यांना तातडीने सुरक्षा पुरवली जावी. त्यांचा स्पष्ट इशारा होता की, जर आरोपींना तातडीने अटक केली नाही, तर राज्यभर या घटनेचा त्रिव निषेध व्यक्त करणारे आंदोलन छेडले जाईल.

डॉ. विश्वासराव आरोटे यांचे म्हणणे आहे की, भारतात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सिद्धार्थ भोकरे यांना जीवे मारण्याची धमकी दिली जात असताना, पत्रकारांवरील दडपण आणि हिंसाचार कोणत्याही परिस्थितीत स्वीकार्य नाही.



पोलिसांकडून तपास:घटनेची गंभीरता लक्षात घेत पोलिसांनी देखील तत्काळ तपास सुरू केला आहे. मुंबई पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करून अज्ञात आरोपींचा मागोवा घेण्याचे आश्वासन दिले आहे. एक वरिष्ठ पोलिस अधिकारी म्हणाले, हे प्रकरण अत्यंत संवेदनशील आहे. आम्ही आरोपपत्र दाखल करण्यासाठी सर्व आवश्यक तपास करीत आहोत.

राज्य सरकारकडून प्रतिसाद: राज्याचे गृहमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांच्या सुरक्षेबाबत गंभीर दखल घेतली आहे. पत्रकार भोकरे यांना तातडीने सुरक्षा पुरविण्याचे आश्वासन दिले आहे. फडणवीस यांनी सांगितले की, पत्रकारांवरील हिंसाचार आणि धमक्या पूर्णपणे रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात येतील.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची भूमिका: महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. संघाच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, पत्रकारांचे काम म्हणजे लोकांचे विचार मांडणे आणि सत्य बोलणे. पत्रकारांना धमकावण्याचे प्रकार सहन केले जाणार नाहीत. आम्ही या घटनेला जशास तशी प्रतिक्रिया देणार आहोत.

संबंधित मुद्दे: अभिव्यक्ती स्वातंत्र्य: भोकरे यांना जीवे मारण्याची धमकी दिली गेली आहे, ज्यामुळे देशातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाबतीत गंभीर प्रश्न उपस्थित होतात.

असे प्रकार भारतीय लोकतंत्रातील स्वातंत्र्याच्या मुलभूत तत्त्वांना धक्का पोहोचवू शकतात.

देशभक्तीचा मुद्दा: भोकरे यांचे पाकिस्तानच्या निषेधासंबंधीचे विचार देशभक्तीच्या परिभाषेला नव्या दृष्टिकोनातून मांडतात. त्यांच्या या विचारांवर झालेल्या प्रतिक्रियांमुळे देशातील विविध विचारधारांमधील वादाची लाट निर्माण होऊ शकते.

ही घटना भारतीय पत्रकारिता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अंगाने एक मोठा धक्का ठरली आहे. या घटनेने राज्य सरकार, पोलिस यंत्रणा आणि समाजाच्या संपूर्ण वर्गासाठी एक गंभीर चेतावणी दिली आहे की, अभिव्यक्तीवर होणाऱ्या दबावांना रोखण्यासाठी एकजूट होणे गरजेचे आहे.

पत्रकार सिद्धार्थ भोकरे यांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर सरकार आणि संबंधित यंत्रणांनी त्वरीत योग्य निर्णय घेतले पाहिजे, ज्यामुळे पत्रकारांवरील हल्ले आणि धमक्यांचा मार्ग बंद होईल.

सिद्धार्थ भोकरे यांना धमकीचे पत्र पाठवण्याबाबत अधिक माहिती मिळाल्यास, नागरिकांना स्थानिक पोलिस ठाणे किंवा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाशी संपर्क साधण्याची विनंती केली जाते.

# कोरोनाची पुन्हा धास्ती ! मृतांचा आकडा २८ वर ; सक्रिय रुग्ण ४००० च्या जवळ

देशात कोरोनाने आपले हातपाय पसरण्यास सुरुवात केली आहे. कोरोनाच्या विषाणूच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढू लागली आहे. देशातील सक्रिय प्रकरणांची संख्या चार हजारांच्या जवळ पोहोचली आहे. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, रविवारपर्यंत ३७५८ सक्रिय रुग्ण होते. मृतांचा आकडा २८ वर पोहोचला आहे. दिल्लीत एकूण सक्रिय रुग्णांची संख्या ४३६ वर पोहोचली आहे. येथे ६१ रुग्णांची वाढ झाली आहे. तर उत्तर प्रदेशात सक्रिय प्रकरणे वाढून १४९ झाली आहेत. त्यामुळे देशातील आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर गेली आहे.

महाराष्ट्रात कोविड १९ चे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. आरोग्य विभागाच्या ताज्या अहवालानुसार, रविवारी राज्यात कोरोनाचे ६५ नवीन रुग्ण आढळले. यापैकी २२ प्रकरणे मुंबईतील, २५ पुण्यातील, ९ ठाण्यातील, ६ पिंपरी-चिंचवडमधील, २ कोल्हापूरातील आणि १ नागपूरमधील आहेत. तथापि, दिलासादायक बातमी अशी आहे की राज्यात ३०० रुग्ण बरे झाले आहेत. सध्या कोविड-१९ च्या सक्रिय रुग्णांची एकूण संख्या ५०६ आहे.

राजस्थानमध्येही कोरोना रुग्णात वाढ राजस्थानमध्येही कोरोनाचे रुग्ण सातत्याने वाढत आहेत. गेल्या २४ तासांत २० नवीन रुग्णांची नोंद झाली. नवीन रुग्णांमध्ये १७ जण राजधानी जयपूरमधील आहेत आणि उदयपूर, बिकानेर आणि डुंगरपूरमधील प्रत्येकी एक रुग्ण आहे. नवीन संक्रमितांमध्ये ७४ आणि ८२ वर्षे वयाच्या दोन वृद्धांचाही समावेश आहे. याशिवाय १९ ते ३० वयोगटातील ७ तरुणांचाही समावेश आहे. राजस्थानमध्ये २० नवीन रुग्णांसह आतापर्यंत ९८ जणांना कोरोनाची लागण झाली आहे. यापैकी एका संक्रमित व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. रुग्णालयात १५ रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

दिल्ली-उत्तर प्रदेश, बंगालमध्येही कोरोनाचा कहर राजधानी दिल्लीत एकूण ४३६ सक्रिय प्रकरणे आहेत. याठिकाणी कोविडमुळे ३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. गुजरातमध्ये ३२० सक्रिय प्रकरणे आहेत. येथे कोरोनामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. हरियाणामध्ये ३० सक्रिय प्रकरणे आहेत. उत्तर प्रदेशात १४९ आणि पश्चिम बंगालमध्ये २८७ सक्रिय प्रकरणे आहेत. उत्तर प्रदेशात कोविडमुळे दोन जणांचा मृत्यू झाला आहे. तामिळनाडूमध्ये १९९ सक्रिय कोविड प्रकरणे आहेत. देशात कोविडमुळे मृत्युमुखी पडलेल्यांची एकूण संख्या २८ वर पोहोचली आहे.

# संपादकीय

## 'ऑपरेशन सिंदूर'वरून राजकीय घमासान

काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला. या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने 'ऑपरेशन सिंदूर' ही लष्करी मोहीम हाती घेतली आणि सात ते दहा मेदरम्यान पाकिस्तानातील विविध दहशतवादी अड्ड्यांवर हवाई हल्ले केले आणि ते उद्ध्वस्त केले. भारताने याला 'निर्णायक कारवाई' असे संबोधले; मात्र ७ मे रोजी झालेल्या हवाई संघर्षात भारताचे नुकसान झाले. हे नुकसान भारताचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान यांनी सिंगापूरमधील मशांग्री-लामध्ये झालेल्या परिषदेमध्ये दिलेल्या मुलाखतीत मान्य केले आहे. जनरल चौहान म्हणाले, आपली काही चूक होती, ती सुधारली आणि दोन दिवसांनी पुन्हा सर्व लढाऊ विमाने पाठवली आणि दहशतवाद्यांच्या हल्ल्याला प्रत्युत्तर दिले.

भारताने पाकिस्तानच्या हवाई दलाला भेदून अगदी अचूकतेने हल्ले केले. जनरल चौहान यांच्या वक्तव्यामुळे भारतीय लष्कराच्या रणनीतीची प्रशंसा झाली असली, तरी विरोधक यावर टीका करत आहेत, की हीच नेमकी माहिती सरकार आधी का देत नव्हते? काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केंद्र सरकारवर थेट आरोप करत जाब विचारला की, सुरुवातीला काही चूक झाली होती, तर ती माहिती जनतेपासून लपवण्यात आली का? त्यांनी १९९९ मधील कारगिल युद्धानंतर तयार झालेल्या 'कारगिल पुनरावलोकन समिती'सारखी स्वतंत्र समिती स्थापन करून 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. याशिवाय त्यांनी या विषयावर खुल्या चर्चेसाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणीही केली आहे, हे विशेष! याच दरम्यान आणखी एक वादग्रस्त बाब समोर आली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा दावा केला की, अमेरिकेने भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धविरामात मध्यस्थी केली आहे. ट्रम्प यांचे हे ११वे वक्तव्य असून, अमेरिकेच्या वाणिज्य विभागाने एका खटल्यात दिलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे याची पुष्टीही केली आहे. काँग्रेसने ट्रम्प यांचे वक्तव्य भारताच्या पारंपरिक द्विपक्षीय परराष्ट्र धोरणाला आव्हान देणारे असल्याचे म्हटले आहे.

शिमला कराराच्या तत्त्वांना यामुळे धक्का बसतो. आश्चर्याची बाब म्हणजे, केंद्र सरकारने या दाव्याला अद्याप स्पष्टपणे नकार दिलेला नाही. ट्रम्प यांचा दावा खराच असेल, तर भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या सार्वभौमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. भारताने कोणत्याही तिसर्या पक्षाला हस्तक्षेपाची मुभा दिली नसेल, तर अमेरिकेच्या बाजूने असा अपप्रचार का केला जात आहे, हे प्रश्न संसदेच्या येत्या अधिवेशनात उलगडले जातील, अशी अपेक्षा आहे. विशेषतः अशा वेळी जेव्हा भारत-अमेरिका संबंध संरक्षण व तंत्रज्ञान सहकार्याच्या दिशेने प्रगती करत आहेत, तेव्हा ही बाब भारतासाठी डोकेदुखी ठरू शकते. विरोधकांचा आरोप आहे की, 'ऑपरेशन सिंदूर' सुरू असताना सरकारने पारदर्शकता दाखवली नाही. माहिती दडपली गेली आणि आता निवडणुकांचा काळ जवळ येत असताना सरकार सैन्याच्या पराक्रमाचा वापर स्वतःच्या प्रतिमेसाठी करत आहे. २०१९ मध्ये पुलवामा हल्ल्यानंतर आणि बालाकोट हवाई हल्ल्यानंतर हाच पॅटर्न दिसून आला होता. सत्ताधारी भाजपने त्यावेळीही सैन्याच्या कारवाईचा वापर निवडणुकीच्या प्रचारासाठी केला होता. बिहारमध्ये येत्या नोव्हेंबरमध्ये होणार्या विधानसभा निवडणुकीतही 'ऑपरेशन सिंदूर' हे राष्ट्रसुरक्षा, निर्णायक नेतृत्व आणि मजबूत भारताचे प्रतीक म्हणून सादर केले जाणार आहे. विरोधक त्याचा वापर सत्ताधारी राजकीय फायद्यासाठी करत असल्याचा आरोप करत आहेत.

बिहारमध्ये आधीच जातीय जनगणना, महागाई आणि बेरोजगारी यासारखे विषय राजकारणाचे केंद्रबिंदू होते. आता 'सीमेवरील युद्ध' विरुद्ध 'संसदेत जबाबदारी' हा नवीन मुद्दा उभा राहिला आहे. राजद आणि जदयूसारख्या प्रादेशिक पक्षांनाही हे संधी वाटत आहे, ज्याच्या माध्यमातून ते भाजपच्या राष्ट्रवादाच्या प्रचाराला लोकशाहीवादी उत्तर देऊ इच्छित आहेत. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भारताला सैन्य कारवाईनंतर पुनरावलोकनासाठी स्वतंत्र आणि प्रभावी यंत्रणा असणे आवश्यक आहे. संसदेत जेव्हा ही चर्चा होईल, तेव्हा स्पष्ट व्हायला हवे की, गुप्तचर यंत्रणांकडून योग्यवेळी सावधगिरीचे इशारे मिळाले होते काय? हवाई दलाला पर्याप्त माहिती आणि पाठबळ मिळाले होते काय? राजकीय नेतृत्वाने सैन्याला स्वतंत्र निर्णय घेण्याची मुभा दिली होती काय? शेवटी प्रश्न असा आहे की, सैन्याच्या शौर्याचा राजकीय फायद्यासाठी वापर होणार असेल, तर ते देशाच्या संस्थात्मक विश्वासाला दीर्घकाळ हानी पोहोचवू शकते. 'ऑपरेशन सिंदूर' आणि त्यावरून निर्माण झालेल्या राजकीय वादांमुळे हे स्पष्ट झाले आहे की, भारतात आता सैन्य, कूटनीती आणि निवडणुका या तिन्ही गोष्टी परस्पर संबंधित बनल्या आहेत. हे लोकशाहीमध्ये असामान्य नाही; परंतु हे तेव्हाच स्वीकारार्ह आहे जेव्हा त्यामध्ये पारदर्शकता आणि जबाबदारीचा समावेश असेल. येणारे संसद अधिवेशन आणि बिहार विधानसभा निवडणुका या चर्चेचे निर्णायक टप्पे ठरतील. विरोधकांकडून सरकारच्या 'ऑपरेशन सिंदूर'बाबत संशय व्यक्त केला जात असताना आगामी निवडणुका लक्षात घेऊन सत्ताधारी भाजपकडून त्याचा वापर राजकीय फायद्यासाठी केला जाईल, हे स्पष्टच आहे. यावरून विरोधक संसदेत सरकारची कशाप्रकारे कोंडी करतील, हे पाहणेही खूपच रंजक ठरणार आहे, हे नक्की! विरोधक या संधीचा कसा काय फायदा उठवतील, हेसुद्धा तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे.

# तुमच्या मोटर इन्श्युरन्स क्लेम साठी सुलभ गाईड

आपली मोटर वाहने आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहेत. आपल्या दैनंदिन जीवनासाठी आपण त्यावर खूप अवलंबून असतो. आज महामारीच्या पार्श्वभूमीवर, लोक सुरक्षिततेचा उपाय म्हणून सार्वजनिक वाहतूक आणि कॅब सेवा टाळत आहेत. त्यामुळे वैयक्तिक वाहनांवर अधिक अवलंबून राहिले जात आहे. जर तुमच्याकडे वाहन असेल तर बहुधा तुमच्याकडे सर्वसमावेशक मोटर इन्श्युरन्स कव्हर किंवा किमान थर्ड पार्टी कव्हर असेल जे कायद्यानुसार अनिवार्य आहे. मोठ्या संख्येने लोक वैयक्तिक वाहने खरेदी करत असल्याने, मोटर इन्श्युरन्स हे सर्वात जास्त मागणी असलेले इन्श्युरन्स प्रॉडक्ट बनले आहे ज्यामुळे दरवर्षी त्यात मोठ्या प्रमाणात क्लेम देखील दिसतात.

आपल्यापैकी बहुतेक जणांसमोर जेव्हा आपला पहिला मोटर क्लेम येतो तेव्हा आपण गोंधळून जातो. या लेखाचा उद्देश मोटर इन्श्युरन्स क्लेमविषयी समजून घेण्यास वाचकांना मदत करणे हा आहे.

क्लेमचे प्रकार

मोटर इन्श्युरन्स क्लेम सामान्यपणे दोन कॅटेगरीमध्ये वर्गीकृत केले जातात – कॅशलेस क्लेम आणि रिएम्बर्समेंट क्लेम.

कॅशलेस क्लेम – कॅशलेस क्लेम अंतर्गत, तुमच्या वाहनाचे नुकसान झाल्यास आणि पुढील दुरुस्तीची आवश्यकता असल्यास तुम्हाला कोणताही आगाऊ खर्च सोसावा लागत नाही. इन्श्युरर त्याच्या नेटवर्क गॅरेजमध्ये दुरुस्तीसाठी झालेला खर्च थेट देय करतो. जेव्हा लागू असेल तेव्हा तुम्हाला म्हणजे कस्टमरला केवळ डेप्रीसिएशन आणि वजावट भरावी लागेल. डेप्रीसिएशनची टक्केवारी कारचे वय आणि भागानुसार बदलते. उदाहरणार्थ, फायबर ग्लास पार्टमध्ये ३०% डेप्रीसिएशन आहे. त्यामुळे जर हा विशिष्ट भाग खराब झाला असेल आणि बदलणे आवश्यक असेल तर इन्श्युरर खर्चाच्या ७०% देय करेल आणि उर्वरित ३०% पॉलिसीधारकाला भरावे लागतील. वजावट म्हणजे इन्श्युरन्स कव्हर सुरू होण्यापूर्वी इन्श्युअर्डला भरावयाची रक्कम. समजा अनिवार्य वजावट रु. २,००० आहे आणि इन्श्युअर्डचा क्लेम रु. ६,००० आहे, तर इन्श्युअर्डला पहिले रु. २,००० भरावे लागतील आणि इन्श्युरर उर्वरित रु. ४,००० भरेल.

एकंदरीत, कॅशलेस सेटलमेंट ही पॉलिसीधारकासाठी एक सुरळीत आणि त्रासमुक्त प्रक्रिया आहे.

रिएम्बर्समेंट क्लेम – रिएम्बर्समेंट क्लेम अंतर्गत, तुमच्या वाहनाचे कोणतेही नुकसान झाल्यास, तुम्ही कोणत्याही गॅरेजमध्ये (नेटवर्क गॅरेजच्या बाहेर) तुमचे वाहन दुरुस्त करून घेऊ शकता. तुम्हाला दुरुस्तीचा खर्च सोसावा लागेल आणि नंतर इन्श्युररकडे रिएम्बर्समेंटसाठी अप्लाय करावे लागेल. तुम्ही वर्कशॉपमधून सर्व दुरुस्ती पावत्या आणि बिल घेतल्याची खात्री करा. क्लेम डॉक्युमेंट्स आणि बिल प्रमाणित केल्यानंतर इन्श्युरर पेमेंट करेल.

घटनेवर आधारित मोटर इन्श्युरन्समध्ये तीन प्रकारचे क्लेम आहेत:–

- थर्ड पार्टी दायित्व
- ओन डॅमेज
- चोरी

थर्ड पार्टी (टीपी) – थर्ड पार्टी हे भारतातील कायद्यानुसार अनिवार्य कव्हर आहे. टीपीचा उद्देश तुमच्या वाहनामुळे झालेल्या नुकसान किंवा दुखापतीमुळे थर्ड पार्टीने क्लेम केलेल्या कायदेशीर दायित्वासाठी कव्हरेज प्रदान करणे हा आहे. टीपी सेक्शन तुम्हाला किंवा तुमच्या वाहनाला कोणतेही कव्हर प्रदान करत नाही. टीपी सेक्शन अंतर्गत, तुमच्या वाहनामुळे थर्ड पार्टीला दुखापत, प्रॉपर्टीचे नुकसान किंवा मृत्यू झाल्यास थर्ड पार्टी भरपाईसाठी क्लेम करू शकते. मृत्यू किंवा दुखापतीच्या बाबतीत भरपाईवर कोणतीही मर्यादा नाही, रक्कम न्यायालयाद्वारे ठरवली जाईल. जर तुम्ही अपघातात थर्ड पार्टी असाल तर तुम्हाला त्वरित एफआयआर दाखल करावा लागेल आणि वाहन मालकाकडून टीपी इन्श्युरन्स तपशील कलेक्ट करावा लागेल. तुम्हाला मोटर क्सिडेंट क्लेम ट्रिब्युनल (एमएसीटी) मध्ये भरपाईसाठी दाखल करावे लागेल. तुम्ही जिथे राहता तिथे किंवा अपघात झालेल्या क्षेत्रात क्लेम दाखल करू शकता.

तुम्ही दाखल करू शकणारे प्रमुख क्लेम पुढीलप्रमाणे:–

- शारीरिक विद्रूपणासाठी भरपाई
- अपंगत्वामुळे कमाईच्या नुकसानीसाठी भरपाई
- वैद्यकीय खर्च
- प्रॉपर्टीचे नुकसान
- अपघातामुळे तुमच्या मृत्यूच्या दुर्दैवी घटनेमध्ये तुमच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती भरपाईसाठी दाखल करू शकतात

ओन डॅमेज (ओडी) – जेव्हा तुमचे वाहन अपघातामुळे नुकसानग्रस्त होते तेव्हा ओडी क्लेम ट्रिगर होतात. पहिली पायरी म्हणजे पोलिस आणि तुमच्या इन्श्युररला सूचित करणे. तुम्ही पोलिस आणि इन्श्युररच्या संमतीशिवाय अपघातस्थळातून तुमचे वाहन हलवू नये. तुम्हाला अपघातस्थळातून वाहन काढून टाकण्यास संमती मिळाली की, तुम्ही वाहन रिस्टोरेशनसाठी नेऊ शकता आणि इन्श्युरर कॅशलेस किंवा रिएम्बर्समेंट आधारावर पेमेंट करेल.

चोरी – तुमचे वाहन चोरीला गेल्यास तुम्हाला पोलिसांकडे एफआयआर रजिस्टर करणे, इन्श्युरर आणि आरटीओला चोरीविषयी सूचित करणे आवश्यक आहे. तुम्हाला इन्श्युररकडे एफआयआर, ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट इ. ची कॉपी सबमिट करणे आवश्यक आहे. पोलिस या प्रकरणाची तपासणी करतील, तथापि, जर तुमचे वाहन ९० दिवसांच्या आत शोधले गेले नाही तर पोलिस नो ट्रेस रिपोर्ट जारी करतील. चोरीच्या बाबतीत क्लेम सेटल करण्यासाठी नो ट्रेस रिपोर्ट अनिवार्य आहे. तुम्ही आवश्यक डॉक्युमेंट्ससह रिपोर्ट सबमिट केल्यानंतर, इन्श्युरर क्लेम सेटलमेंटसाठी प्रोसेस सुरू करेल.

डिजिटाईज्ड क्लेम प्रोसेस

इन्श्युरन्स इंडस्ट्री जलदपणे डिजिटलायझेशनच्या दिशेने जात आहे आणि वेगवान क्लेम सेटलमेंटसाठी वैज्ञानिक प्लिकेशन्सच्या माध्यमांचा वापर करीत आहे. क्लेम सेटलमेंटमध्ये अशा एक इनोव्हेशनला स्पॉट सेटलमेंट म्हणतात जे इन्श्युररच्या प्स किंवा वेबसाईटद्वारे केले जाते. इन्श्युअर्डला फक्त त्यांच्या वाहनाच्या नुकसानीचे फोटो काढणे आणि ते इन्श्युररच्या प किंवा पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. इन्श्युरर या फोटो आणि डाटा नालिटिक्स टूल्सचा वापर करतात आणि क्लेम रक्कम ठरवतात, जी इन्श्युअर्डला स्वीकार्य असल्यास, २० मिनिटांपेक्षा कमी वेळात सेटल केली जाऊ शकते. अशा इनोव्हेशनसह, इन्श्युअर्ड कमी टर्नअराउंड वेळेसह सहजपणे त्यांचा क्लेम सेटल करू शकतात आणि कोणत्याही आर्थिक त्रासाशिवाय त्यांचे वाहन दुरुस्त करून घेऊ शकतात.

शेवटी मी असे म्हणेन की, एक सुरळीत आणि त्रासमुक्त क्लेम प्रोसेस कस्टमरसाठी अतिशय दिलासादायक असते. जेव्हा तुम्ही तुमच्या इन्श्युररचे मूल्यांकन करत असाल तेव्हा हा एक फरक पाडणारा घटक असू शकतो. सुरक्षितपणे ड्राईव्ह करा, तुमच्या राईडचा आनंद घ्या आणि दुर्दैवी अपघाताच्या बाबतीत, नेहमीच तुमच्या इन्श्युररशी संपर्क साधा!

– टी ए रामलिंगम, मुख्य तांत्रिक अधिकारी, बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स


# हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी देशहिताच्या दृष्टीने सत्य बाजू मांडली.

देशाच्या भोवताल भारत विरोधी जाळे विणले आहे यात मुख्य भूमिका चीनची असुन चीनच्या मदतीने पाकिस्तान, बांग्लादेश हे देश नेहमीच काहीतरी कुरापती निर्माण करीत असतातच. कारण यांना भारताचा विकास पहावत नाही. त्यामुळेच सिमावर्ती भागात आपल्याला आतंकवादी कारवाया मोठ्या प्रमाणात दिसून येतात. आज संपूर्ण जग अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे.त्या अनुषंगाने भारताचीही संपूर्ण तयारी सुध्दा आहे आणि त्या दिशेने जात आहे यात दुमत नाही.परंतु जेव्हा देशाच्या सुरक्षेचा प्रश्न येतो तेव्हा आपल्या जवळ संपूर्ण अत्याधुनिक सामुग्री असने गरजेचे असते.परंतु आपण जेव्हा कोणत्यांही देशा सोबत किंवा देशातील कंपनी सोबत कोणत्याही शस्त्रांचा करार यासाठी केला जातो की आपल्याला माहीत असते की या वस्तू किंवा सामग्री ठराविक वेळेपर्यंत आपल्याजवळ उपलब्ध होईल.परंतु असे होत नसल्याचे स्पष्ट दिसून येते.त्यामुळे हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह यांनी उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत वाजवी आणि देश हिताचा आहे असे मला वाटते. कारण देशाच्या १४० कोटी जनतेच्या सुरक्षा कवचचा प्रश्न, देशाच्या सिमावर्ती भागाचा प्रश्न आणि सैन्य शक्तीचा प्रश्न महत्त्वाचा आहे त्यामुळे कोणत्याही सुरक्षा व्यवहारामध्ये कोणत्याही प्रकारच्या करारामध्ये हयगय किंवा दिरंगाई झाली तर त्याचे प्रायश्चित्त देशाला व देशातील नागरिकांना गंभीर स्वरूपात भोगावे लागु शकतात. त्यामुळे देशाच्या सुरक्षिततेच्या बाबतीतील कोणताही करार असो तो तंतोतंत व सटीक असायला हवा यात कोणत्याही प्रकारची हयगय किंवा विलंब नकोच.भारताच्या संरक्षण खरेदी प्रकल्पांना सातत्याने होणाऱ्या विलंबाबद्दल हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी दिनांक २९ मे २०२५ ला भारतीय उद्योग महासंघाची (सीआयआय) वार्षिक शिखर परिषद दिल्लीत झाली.यावेळी हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग बोलत होते.यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, नौदल प्रमुख डमिरल दिनेश त्रिपाठी, सीआयआयचे अध्यक्ष संजीव पुरी, डीआरडीओ चे अध्यक्ष डॉ.समीर कामत आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.करारांमधील अवास्तव कालमर्यादांवर आणि कामगिरीतील कमतरतांवर स्पष्टपणे बोलण्याचे धारिष्ट्य न दाखवणाऱ्या संरक्षण अधिकाऱ्यांवरही यावेळी एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी टीका केली व सर्वांच्या उपस्थितीत एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.ते म्हणतात की अनेकदा आम्हाला करार करतांना माहीत असते की संबंधित प्रणाली कधीच येणार नाही.असा एकही प्रकल्प मला आठवत नाही जो वेळेवर पुर्ण झाला आहे. आपण असे आश्वासन का देतो,जे साध्य करता येत नाही?या शब्दात हवाई दलप्रमुखांनी आपली नाराजी व्यक्त केली. माझ्यामते हवाईदल प्रमुखांची नाराजगी देशहिताच्या दृष्टीने वाजवी असल्याचे मी समजतो. विशेषत: स्वदेशी प्रकल्पांशी संबंधित असलेल्या अनेक संरक्षण प्रणालीच्या विलंबाकडे हवाई दलप्रमुखांनी यावेळी लक्ष वेधले हलक्या लढाऊ विमानांच्या (एलसीए) प्रकल्पाचा संदर्भ देत ते म्हणाले,तेजस एमके १ए या लढाऊ विमानांसाठी फेब्रुवारी २०२१ मध्ये हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड सोबत (एचएएल) ४८ हजार कोटी रुपयांचा करार करण्यात आला.करारानुसार या विमानांचे वितरण मार्च २०२४ पासून अपेक्षित होते.मात्र मागणी केलेल्या ८३ पैकी एकाही विमानाचे वितरण करण्यात आलेले नाही.ही देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक बाब आहे.कारण ज्या विमानांचे उत्पादन आपल्याला भारतातच करायचे आहे आणि आपण कराराचे पालन करीत नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे.यावर प्रधानमंत्री, राष्ट्रपती व रक्षा मंत्रालयाने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व विलंब का होत आहे याचीही चौकशी व्हायला पाहिजे व सरकारने हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड ला जाब विचारायला पाहिजे की आपण कराराची पुर्तत: का केली नाही?याकरीता हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड ला दंडीत सुध्दा करायला पाहिजे आणि भविष्यात कोणत्याही प्रकारच्या कराराच्या बाबतीत दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही अशा पध्दतीचा नोटीस सरकारने हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडला बजावला पाहिजे.कारण देशाच्या सुरक्षिततेच्या प्रश्न आहे यात कोणत्याही प्रकारची तडजोड नकोच. देशांतर्गत किंवा विदेशांतर्गत कोणत्याही प्रकारचा करार असो त्याची पुर्तता वेळेवरच झाली पाहिजे तेव्हाच त्याला योग्य करार समजल्या जाईल.ऑपरेशन सिंदूर बद्दल बोलताना हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग म्हणतात ऑपरेशन सिन्दुर चा राष्ट्रीय विजय म्हणून गौरव केला आणि ही मोहीम अंमलात आणण्यासाठी सर्व सैन्य दलांनी एकत्र येऊन काम केल्याचे सांगितले.ही बाब सत्य आहे की ऑपरेशन सिन्दुर हा राष्ट्रीय विजय आहे.त्यामुळे मी राजकीय पुढाऱ्यांना विनंती करतो की ऑपरेशन सिन्दुर बद्दल राजकारण न करता राष्ट्रीय विजय समजले पाहिजे.सरकारला विनंती करतो की रक्षा कराराच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा विलंब किंवा दिरंगाई सरकारने खपवून घेवू नये.यामुळे देशाला मोठे नुकसान होवू शकते.हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी भारतीय उद्योग महासंघाच्या व्यापार शिखर परिषदेत अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करून सरकारला जागे केले आहे याकरीता सरकारने त्यांचा सन्मान करायला पाहिजे पुढील कारवाईसाठी कठोर पावले उचलली पाहिजेत.सरकारने आतातरी अमर प्रीत सिंग यांच्या वक्तव्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील संपुर्ण कराराचे व व संरक्षण खरेदी प्रकल्पांचे तंतोतंत पालन करून यात कोणतीही दिरंगाई होणार नाही याची जातीने काळजी घ्यावी यातच खरे देश हित आहे.सन्माननीय हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी देशाच्या जनतेपुढे जी सत्यता मांडली ही बाब देश कधीच विसरणार नाही.त्याकरीता त्यांना कोटी-कोटी प्रणाम,जय हिंद, जय भारत!

*****

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर
(महाराष्ट्र राज्य)

# मी वाचलेलं पुस्तक: -बुद्ध ज्ञान की भूमि श्रावस्ती...!




विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, अगर मरने के बाद भी जीना चाहो तो एक काम जरूर करना, पढने लायक कुछ लिख जाना, लिखने लायक कुछ कर जाना. या चार ओळीमध्ये बाबासाहेबांनी साहित्याविषयी आपल्या मोलाच्या लेखणीतून तसेच प्रेरणादायी अनुभवातून खूप मार्गदर्शन केले आहेत. कारण साहित्य अशी एक संपत्ती आहे की ती कधीच मिटत नाही. त्या लिहिलेल्या साहित्यातून येणारी भावी पिढी प्रेरणा घेत असते तर अनेकांना जगण्याला नव्याने उभारी मिळत असते.म्हणूनच म्हणतात की साहित्य हे जीवन आहे. मग ते साहित्य कोणत्याही प्रकारातील का असेनात ते साहित्य दिशादर्शक असणे आजच्या घडीला काळाची गरज आहे. असाच एक हिंदी भाषेतील पुस्तक माझ्यापर्यंत पोहोचला आहे. त्या पुस्तकाचे नाव बुद्ध ज्ञान की भूमि, श्रावस्ती या पुस्तकाचे लेखक डॉ.के. पी. वासनिक नवी दिल्ली येथून आहेत. या आधी सुद्धा त्यांनी भगवान गौतम बुद्ध आनंदी जीवनाचा मार्गदाता नावाचा ग्रंथ लिहून समाजात भगवान बुद्धांच्या विचाराची पेरणी केली आहे आणि खऱ्या अर्थाने साहित्याची सेवा करत आहेत. आजपर्यंत लेखक वासनिक यांनी बरेच पुस्तके लिहिलेले आहेत त्यातील हा सुद्धा पुस्तक फारच वाचनीय तसेच खूप काही शिकायला लावणारा आहे. हा पुस्तक नसून एक प्रकारचा ग्रंथ आहे. लेखक वासनिक हे अतिशय अभ्यासू तसेच विचारवंत साहित्यिक आहेत म्हणून आज त्यांचे साहित्य मोठ्या प्रमाणात वाचले जातात.या ग्रंथा बद्दल लेखक डॉ. वासनिक यांना अनेक शुभेच्छा देते.खास करून लेखकाचे मी धन्यवाद मानते की, माझ्यासारख्या सामान्य भगिणीकडे या महान ग्रंथावर समीक्षा लिहिण्यासाठी माझी निवड केली आणि ही छोटीशी सेवा करण्याची मला संधी दिल्याबद्दल.

तथागत भगवान गौतम बुद्धावर लिखाण करणे पाहिजे तेवढे सोपे काम नाही त्यासाठी स्वतः ही तेवढे प्रामाणिक असावे लागते, विचार सुद्धा तेवढेच सकारात्मक असणे गरजेचे असते एवढेच नाही नि:स्वार्थ भावना आणि सत्याच्या वाटेवर चालण्याची तयारी ठेवावी लागते, तेवढाच अभ्यास सुद्धा असावा लागतो,तसेच जगणेही आवश्यक असते सोबतच आपली विचारसरणी सुद्धा तेवढीच सकारात्मक असणे गरजेचे असते तेव्हाच कुठेतरी असे मौल्यवान शब्दांचा भंडार मिळत असतो आणि एखादं ग्रंथ तयार होतं. लेखक डॉ. वासनिक यांच्या मनोगतातून वाचतांना तसेच या ग्रंथाचे महत्व सहजपणे कळत असते म्हणून कोणत्याही महापुरुषांवर लिखाण करताना आधी त्यांना वाचणे गरजेचे असते.लेखक वासनिक यांनी भगवान गौतम बुद्धाला वाचले आहेत आणि त्यांना समर्पित झाले आहेत म्हणून कदाचित एवढे मोठे ग्रंथ लिहून माणूस होण्याच्या नात्याने ही फार मोठी साहित्य सेवा देत आहेत.

श्रावस्ती हे प्राचीन भारताचे कौशल राज्यची राजधानी होती आणि याच राजधानीतील बराच इतिहास लेखकांनी लिहिले आहेत तसेच महत्वपूर्ण पर्यटक स्थळ आणि बरेच काही. तसेच या राजधानीत भगवान बुद्ध गेले तेव्हा तेथील अनेक लोकांना आपला उपदेश देऊन त्यांच्यात करूणा जागवली, त्यांच्यात हळूहळू परिवर्तन व्हायला लागले. आणि लहान मुलांपासून ते वयाने मोठे असणारे माणसं सुद्धा भगवान बुद्धाला गुरुदेव म्हणू लागले. या ग्रंथात अंगुलिमाल, भगवान बुद्धाची प्रमुख शिष्या विशाखा यांच्यावर सुद्धा लेखकांनी संपूर्ण कथा लिहिलेली आहे.



तसेच श्रावस्ती या राजधानीत जेव्हा भगवान बुद्ध आणि त्यांचे भिक्षु भिक्षा मागण्यासाठी गेले होते. या ग्रंथातील काही ओळी मी लिहीत आहे. रस्त्याच्या बाजूला भाताचे शेत होते त्या शेतात लहान मुले खेकडे पकडून त्यांचे पाय कापून घेतले आणि मग पुन्हा त्याच शेतात ते खेकडे सोडून दिले आणि मोठ्या आनंदाने टाळी वाजवून हसत होते. हे सर्व बघून भगवान बुद्धांनी त्या मुलांना म्हटले की, बच्चो,अगर कोई तुम्हारे पैर काट दे तो तुम्हें दर्द होगा या नही मुलांचा उत्तर होय गुरूदेव असं म्हटल्यावर भगवान बुद्धानी आपले अनमोल विचार सांगण्याला सुरुवात केली की, या एवढ्या खेकड्यात तुमच्या बाबासारखे इथे सुद्धा एखादा बाप असतो आई असते, भाऊ असतो , बहीण असते हे , भगवान बुद्ध आणि लहान मुलांमधील संवाद होताना बघून काही वेळांनी लोकांची तेथे गर्दी झाली.

खरंच तो क्षण कसा असेल जेव्हा भगवान बुद्ध आपल्या अनमोल ज्ञानातून उपदेश देत होते. भगवान बुद्धाचे ज्ञान हे आजच्या मानवी जीवनाचे खऱ्या अर्थाने सार्थक करणारे आहेत. भगवान बुद्धांनी सर्वावर प्रेम करण्याची शिकवण दिली, सर्वाचा आदर करायला शिकवलं, मैत्रीचं नातं किती श्रेष्ठ असते तेही सांगितले, जास्त अपेक्षा केलं तर दु:ख येतात म्हणून कोणतीही अपेक्षा करू नये भगवान बुद्धाच्या ज्ञानामुळे आणि उपदेशातून अंगुलिमाल सारखा हिंसक व डाकू एक दिवस असा माणूस बनला की बघताना सर्वांना आश्चर्य वाटू लागले म्हणून आजही भगवान बुद्धावर लिहिलेल्या ग्रंथाचे वाचन करताना अंगुलिमालचा उल्लेख असतोच. हे सर्व भगवान बुद्धाच्या अफाट ज्ञानातून पुन्हा त्यांना एकदा नव्याने जीवन जगायला मिळाले होते.लेखक वासनिक यांनी हा ग्रंथ लिहून खूप मोठे पुण्यकर्म केले आहेत आणि खास करून हा ग्रंथ प्रत्येकांनी वाचावा असंच आहे या ग्रंथातून सर्व काही शिकायला मिळत असते, मी सर्वच ग्रंथ पूर्ण वाचून काढली आहे वाचताना कुठेतरी एक प्रकारची मला उर्जा मिळाली मी माझे भाग्य समजते.

की एवढा अनमोल शब्दांचा साठा असलेला ग्रंथ माझ्या हातात मिळाला आणि वाचन करायला मिळालं, या ग्रंथाच्या मुखपृष्ठावर भगवान बुद्धाचे फोटो बघताच विशेष मनाला शांती आणि समाधान मिळाले. या महान ग्रंथावर समीक्षा लिहिण्यासाठी मी तेवढी मोठी नाहीच पण, मला समीक्षा लिहायला मिळालं कदाचित भगवान बुद्धाचे हे, आशीर्वाद असावेत असे मला वाटते. आजच्या समाजाला जागृत करणारा हा महान ग्रंथ डॉ.के.पी.वासनिक यांनी लिहून खऱ्या अर्थाने भगवान बुद्धाच्या विचारांवर चालून खूप मोठी सेवा देत आहेत. हा ग्रंथ नक्कीच वाचकांना आवडेल यात काही शंका नाही. पुढेही असे अनेक साहित्य लेखकाच्या हातून लिहिले जावेत यासाठी भगवान बुद्धाच्या चरणी मी वंदन करते.

******

*पुस्तकाचे नाव: -बुद्ध ज्ञान की,भूमि,श्रावस्ती*
*लेखक:-डॉ.के.पी.वासनिक ईजी* *१२,इंदर पुरी नवी दिल्ली -११००१३*
*मो.नं.९८९११९०१३१६*
*सिद्धार्थ बुक्स*
*डॉ. आंबेडकर गेट,रामनगर एक्सटेंशन, मंडोली रोड,शाहदरा, दिल्ली ११००३२*
*मूल्य केवळ /३५० रूपये*

*समीक्षक: -सौ.संगीता संतोष ठलाल* *मु.कुरखेडा जि. गडचिरोली ७८२१८१६४८५*

## डाळ खाऊन कंटाळा आला आहे? ओल्या खोबऱ्याचे वाटण लावून झटपट बनवा चविष्ट दह्यातले पालक, नोट करून घ्या रेसिपी

निरोगी आरोग्यासाठी पालेभाज्या खाणे अतिशय पौष्टिक आहे. मात्र लहान मुलांसह मोठ्यांना पालेभाज्या खायला अजिबात आवडत नाही. पालेभाज्यांचे नाव ऐकल्यानंतर अनेक लोक नाक मुरडतात. पण केस, त्वचा आणि निरोगी आरोग्यासाठी नियमित पालेभाज्या खाणे फायद्याचे आहे. बऱ्याचदा दुपारच्या किंवा संध्याकाळच्या जेवणात नेहमीच डाळ खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची सगळ्यांची इच्छा होते. अशावेळी तुम्ही दह्यातले पालक बनवू शकता. दही खाणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. यामुळे पोटात वाढलेली उष्णता कमी होऊन शरीर थंड राहते. याशिवाय पालकच्या भाजीचे सेवन केल्यामुळे शरीरात निर्माण झालेली रक्ताची कमतरता दूर होते आणि शरीरात हिमोग्लोबिन वाढू लागते. चला तर जाणून घेऊया दह्यातले पालक बनवण्याची सोपी रेसिपी.





साहित्य:

दही

पालक

मीठ

ओलं खोबर

हिरवी मिरची

तूप

जिरं

उडीद डाळ

मोहरी

लाल मिरच्या

कढीपत्ता

कृती: दह्यातले पालक बनवण्यासाठी सर्वप्रथम, पालक स्वच्छ साफ करून घ्या. त्यानंतर पाण्यात टाकून ठेवा.

मिक्सरच्या भांड्यात किसून घेतलेलं खोबर, जिरं, हिरवी मिरची घालून बारीक पेस्ट तयार करा.

टोपात दही घेऊन त्यात थोडस पाणी घालून व्यवस्थित मिक्स करून घ्या. दह्यात जास्त पाणी घालू नये.

कढईमध्ये पालक आणि थोडस पाणी घालून पालक व्यवस्थित शिजवून घ्या. त्यानंतर त्यात ओल्या खोबऱ्याचं वाटण घालून पुन्हा एकदा उकळी येईपर्यंत शिजवा.

पालक आणि वाटण व्यवस्थित शिजल्यानंतर त्यात चवीनुसार मीठ घालून पुन्हा एकदा मिक्स करून घ्या.

नंतर त्यात मिक्स करून घेतलेले दही घालून सतत ढवळत राहा.

फोडणीच्या भांड्यात तूप गरम करून त्यात मोहरी, जिरं, लाल मिरची, उडीद डाळ, कढीपत्ता घालून भाजून घ्या.

भाजून झालेली फोडणी तयार केलेल्या ताकाच्या मिश्रणात ओतून मिक्स करून घ्या. फोडणी व्यवस्थित मिक्स झाल्यानंतर ढवळून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले दह्यातले पालक.

## वाढलेले वजन कमी करण्यासाठी संध्याकाळच्या नाश्त्यात बनवा हाय प्रोटीन सॅलड, नोट करून घ्या रेसिपी

वजन वाढल्यानंतर शरीराला हानी पोहचण्याची शक्यता असते. वजन वाढल्यानंतर शरीरावर अनावश्यक चरबी वाढू लागते. या चरबीमुळे मधुमेह,. कोलेस्ट्रॉल वाढणे, उच्च रक्तदाब इत्यादी अनेक गंभीर समस्या उद्भवू लागतात. या समस्या उद्भवू लागल्यानंतर बऱ्याचदा शरीराकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र दुर्लक्ष न करता वाढलेले वजन कमी करण्यावर भर द्यावा. वजन वाढल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. अनेक महिला प्रोटीनशेक, बाजारात उपलब्ध असलेले महागडे डाएट इत्यादी अनेक गोष्टी केल्या जातात. मात्र तरीसुद्धा वाढलेले वजन कमी होत नाही. तर काही लोक सकाळचा आणि संध्याकाळचा नाश्ता करणे टाळतात. पण असे न करता नाश्ता करणे आवश्यक आहे. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला वाढलेले वजन कमी करण्यासाठी हाय प्रोटीन सॅलड बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत.



(फोटो सौजन्य – ळडींलज्ञ)

साहित्य:

काकडी

उकडलेले चणे

टोमॅटो

कांदा

हरभरे

दही

लिंबाचा रस

कोथिंबीर

पुदिन्याची पाने

काळीमिरी पावडर

मीठ

चाट मसाला

कृती: हाय प्रोटीन सॅलड बनवण्यासाठी सर्वप्रथम, काकडी स्वच्छ धुवून बारीक तुकडे करून घ्या. यासोबतच कांदा, टोमॅटोसुध्दा बारीक करून घ्या. मोठ्या वाटीमध्ये बारीक करून घेतलेली काकडी, कांदा, टोमॅटो, शिजवलेले हरभरे, काळे चणे, राजमा आणि मूग, मटकी घालून व्यवस्थित मिक्स करा.

त्यानंतर त्यात लिंबाचा रस, पुदिन्याची पाने, कोथिंबीर घालून व्यवस्थित मिक्स करा.


नंतर त्यात चाट मसाला, चवीनुसार मीठ घालून व्यवस्थित मिक्स करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले हाय प्रोटीन सॅलड.

कडधान्य आणि पौष्टिक भाज्यांचा वापर करून बनवलेले सॅलड वाढलेले वजनच नाहीतर आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी सुद्धा मदत करते.

## त्वचा सुंदर करण्यासाठी महागडे प्रॉडक्ट वापरण्याऐवजी पपईच्या पानांचा 'या' पद्धतीने करा वापर, पिंपल्स होतील कायमचे गायब

सर्वच महिलांना सुंदर आणि चमकदार त्वचा हवी असते. सुंदर त्वचेसाठी महिला सतत काहींना काही करत असतात. बाजारात उपलब्ध असलेले अनेक वेगवेगळे केमिकलयुक्त प्रॉडक्ट, फेसपॅक, फेसमास्क इत्यादी अनेक गोष्टी वापरल्या जातात. मात्र सुंदर त्वचेसाठी केमिकल प्रॉडक्टचा वापर करण्याऐवजी घरगुती पदार्थांचा वापर करावा. यासाठी पपईचा वापर करावा. पपई आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. यामध्ये असलेल्या विटामिन सी आणि फायबरमुळे शरीराला अनेक फायदे होतात. पपईमध्ये असलेले विटामिन सी त्वचा निरोगी ठेवण्यासाठी मदत होते. पपईमध्ये असलेले पपेन, अँटीऑक्सिडंट्स आणि विटामिन त्वचा उजळदार करण्यासाठी मदत होते.

पपईसोबत पपईची पाने सुद्धा आरोग्यासाठी अतिशय महत्वाची आहे. चेहऱ्यावर आलेले डाग, डेड स्किन, काळे डाग कमी करण्यासाठी मदत करतात. त्वचेचे सौंदर्य वाढवण्यासाठी पपईच्या पानांचा वापर करावा. पपईच्या सालींपासून,पानांपर्यंत, बियांपासून सगळ्याचं गोष्टींसाठी केला जातो. यासाठी सुंदर त्वचेसाठी पपईच्या गराचा वापर केला जातो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला पपईच्या पानांचा वापर कशा पद्धतीने करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. पपईची पाने आरोग्यासह त्वचेसाठी अतिशय फायदेशीर आहे.





पपईच्या पानांचा फेसपॅक बनवण्याची कृती:

पपईच्या पानांचा फेसपॅक बनवण्यासाठी सर्वप्रथम, पपईची पाने स्वच्छ पाण्याने धुवून घ्या. त्यानंतर मिक्सरच्या भांड्यात पपईची पाने घालून त्यात थोडस पाणी घालून मिक्स करा. तयार केलेल्या पेस्टमध्ये मध आणि बेसन घालून मिक्स करा. तयार केलेले मिश्रण व्यवस्थित मिक्स करून झाल्यानंतर संपूर्ण चेहऱ्यावर लावून काहीवेळ तसाच ठेवा. फेसपॅक चेहरा आणि मानेवर लावून २० ते २५ मिनिटं ठेवून घ्या. त्यानंतर पाण्याने चेहरा स्वच्छ धुवून घ्या. हा उपाय आठवड्याभर नियमित लावल्यास त्वचा अतिशय उजळदार होईल. पपईच्या पानांचा फेसपॅक त्वचा नैसर्गिकरित्या चमकदार आणि सुंदर करण्यासाठी मदत करतात.

पपईचा पानांचे त्वचेला होणारे फायदे:

पपईची पाने आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहेत. यामध्ये अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आहेत. मुरुमांपासून त्वचेचे रक्षण करण्यासाठी पपईच्या पानांचा वापर करावा. यामुळे त्वचा आतून स्वच्छ होते.

पपईच्या पानांमध्ये असलेले एन्झाईम्स त्वचेवरील डेड स्किन काढून टाकण्यासाठी मदत करतात. यामुळे त्वचा अतिशय चमकदार होते. चेहऱ्यावर आलेले काळे डाग घालवण्यासाठी पपईच्या पानांचा वापर करावा.

त्वचेची लवचिकता वाढवण्यासाठी पपईच्या पानांचा वापर करावा. वाढत्या वयात चेहऱ्यावर वाढलेल्या सुरकुत्या कमी करण्यासाठी पपईची पाने वापरावी. पपईची पाने त्वचेला थंड करतात.

## विधी संघर्षग्रस्त बालकांना मिळणार बालस्नेही आधार
### विधी संघर्ष बालकांसाठी लातूर मध्ये 'मदत कक्षा'चे उद्घाटन

लातूर :- अजीम प्रेमजी फाउंडेशनच्या सहकार्याने व टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली कलापंढरी संस्थेमार्फत लातूर येथील बाल न्याय मंडळ आणि निरीक्षण गृहात शुक्रवार, दि. ३० मे २०२५ रोजी विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी 'मदत कक्षा'चे उद्घाटन करण्यात आले.

या मदत कक्षाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा बाल न्याय मंडळाच्या प्रमुख श्रीमती आरती शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री. जावेद शेख , निरीक्षण गृहाचे अधीक्षक श्री. जोंधळे , बाल न्याय मंडळाच्या सदस्या श्रीमती छाया मलवाडे व श्रीमती छाया अकाते, बालकल्याण समितीच्या सदस्या श्रीमती स्वाती तोडकर, कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी पी सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना श्रीमती आरती शिंदे म्हणाल्या की, मुलांनी चांगल्या मित्रांची संगत धरावी आणि शिक्षणाचे महत्त्व जाणावे. किरकोळ गुन्ह्यांचे प्रमाण रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक प्रक्रियेवर भर देणे आवश्यक आहे. अनेकदा मुले विनाकारण अशा प्रक्रियेत ओढली जातात, त्यांना बालस्नेही वातावरण देऊन मार्गदर्शन व सहकार्य करणे गरजेचे आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकांची जबाबदारी केवळ पालक किंवा शासनाची नसून संपूर्ण समाजाची आहे. यासाठी समाजातील सुजाण व प्रशिक्षित



कार्यकर्त्यांनी गावपातळीवरील पोलीस स्टेशनमध्ये बालस्नेही कार्यकर्ता म्हणून काम पहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री. जावेद शेख यांनी 'मदत कक्ष' हा विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी बाल न्याय प्रणाली अधिक सुलभ व प्रभावी करण्याच्या दृष्टीने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगितले. संपूर्ण महाराष्ट्रातून केवळ पाच जिल्ह्यांमध्ये लातूरची निवड होणे ही आपल्यासाठी एक सुवर्णसंधी आहे, असे नमूद करत त्यांनी मदत कक्षाच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिवदर्शन सदाकाळे यांनी तर आभार बाल निरीक्षण गृहाचे अधीक्षक श्री. जोंधळे यांनी मानले


हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कलापंढरी संस्थेचे कार्यक्रम व्यवस्थापक शिवदर्शन सदाकाळे, जयवंत जंगापल्ले, धनराज पवार, अक्षता सूर्यवंशी ड. सुनेना बायस, मंगल मगर, तसेच गावपातळीवरील सर्व समुदाय संघटकांनी परिश्रम घेतले.

## ग्रेव्हीमध्ये बुडालेले टेस्टी आणि ज्यूसी गहेश्र चो कधी खाल्ले आहेत का? नेपाळची फेमस रेसिपी

मोमो हा एक पाश्च्यात्य पदार्थ असला तरी जगभरात त्याला आवडीने खाल्ले जाते. भारतातही याची क्रेझ काही कमी नाही. आजकाल बाजारात अनेक वेगवेगळ्या प्रकारचे मोमोज उपलब्ध असतात जसे की, व्हेज मोमो, पनीर मोमो, चिकन मोमो, तंदुरी मोमो आणि यातीलच एक म्हणजे झोल मोमो! झोल मोमो ही एक नेपाळी डिश आहे, ज्यात मोमोजलामसालेदार आणि आंबट रसात बुडवून खाण्यासाठी सर्व्ह केले जाते. आमच्यावर विश्वास ठेवा याची चव इतर मोमोजहून फार वेगळी असते आणि चवीला ती अप्रतिम लागते.

झोल मोमो म्हणजे गरमागरम मोमोज एका झणझणीत, रसदार झोलमध्ये बुडवलेले असतात. हा पदार्थ अत्यंत चवदार, मसालेदार आणि पचनास हलका असतो. नुकताच पावसाळा ऋतूही सुरु झाला आहे, अशात पावसाच्या या थंड वातावरणात गरमा गरम ग्रेव्हीत बुडवलेल्या झोल मोमोची चव लाजवाब लागेल. यंदाच्या पावसाळ्यात हे गरमा गरम झोल मोमो एकदा नक्की बनवून पहा. चला जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.





साहित्य मैदा – २ कप

मीठ – १/२ टीस्पून

पाणी – लागेल तसं

तेल – १ टीस्पून (मोमो बनवताना)

किसलेले गाजर – १/२ कप

बारीक चिरलेले कोबी – १ कप

पनीर – १/२ कप (ऐच्छिक)

आले-लसूण पेस्ट – १ टीस्पून

हिरवी मिरची – १ (बारीक चिरलेली)

सोया सॉस – १ टीस्पून

मीठ – चवीनुसार

मिरे पावडर – १/२ टीस्पून

तेल – १ टीस्पून

टोमॅटो – २ मध्यम

लाल सुक्या मिरच्या – ४-५

लसूण – ५-६ पाकळ्या

तीळ – २ टेबलस्पून

साजूक तूप – १ टीस्पून

आलं – १ इंच तुकडा

मीठ – चवीनुसार

लिंबाचा रस – १ टेबलस्पून

कृती झोल मोमो तयार करण्यासाठी सर्वप्रथम मैदा, मीठ आणि थोडं तेल एकत्र करून पाणी घालून मळून घ्या

लक्षात ठेवा याच पीठ मऊसर पण घट्टसर हवं

पीठ मळून झाल्यानंतर त्याला झाकून ३० मिनिटं बाजूला ठेवा

आता एका पॅनमध्ये थोडं तेल गरम करा

मग त्यात आले-लसूण पेस्ट, हिरवी मिरची टाकून परतून घ्या

यानंतर यात गाजर, कोबी, पनीर घालून सर्वकाही नीट परतून घ्या

मग यात सोया सॉस, मीठ, काळीमिरी पावडर घालून २-३ मिनिटं परतून घ्या आणि गॅस बंद करा

पीठाचे लहान गोळे करून पातळ पुऱ्या लाटून त्यात तयार स्टफिंग भरून मोमोजचा आकार द्या

स्टीमरमध्ये १०-१२ मिनिटं वाफवून घ्या

झोल तयार करण्यासाठी प्रथम लाल मिरच्या गरम पाण्यात १० मिनिटं भिजवून ठेवा

तीळ कोरडे खरपूस भाजून घ्या

यांनतर टोमॅटो, लसूण, आलं, लाल मिरच्या, तीळ, मीठ, आणि लिम्बाचा रस मिक्सरमध्ये वाटा, आवश्यक

असल्यास थोडं पाणी घाला

आता एका पॅनमध्ये तूप गरम करून हे मिश्रण थोडं परतून घ्या आणि मग गॅस बंद करा

शेवटी तयार झोल एका वाटीत काढा आणि त्यात तयार मोमोज टाका


वरून कोथिंबीर अथवा चिली ऑइल टाका आणि तयार झोल मोमो खाण्यासाठी सर्व्ह करा

झोल जरा पातळसुद्धा ठेवू शकता – सूपसारखा

स्टफिंगसाठी पनीरऐवजी तुम्ही चिकन किंवा सोयाबीन वापरू शकता

## पावसाळ्यातील केस कोरडे आणि निस्तेज होतात? मग जास्वंदीच्या फुलांपासून घरीच तयार करा हेअर मास्क, केस होतील मऊ

राज्यासह संपूर्ण देशभरात मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. पाऊस पडण्यास सुरुवात झाल्यानंतर सगळीकडे वातावरणात थंडावा निर्माण होतो. मात्र या दिवसांमध्ये त्वचा आणि केसांसंबधित अनेक समस्या उद्भवू लागतात. त्वचा अतिशय तेलकट आणि चिकट होऊन जाते, तर केस पूर्णपणे कोरडे आणि निस्तेज होतात. केसांची काळजी घेण्यासाठी महिला बाजारात उपलब्ध असलेले वेगवेगळे शॅम्पू, हेअर मास्क, हेअरन केअर प्रॉडक्ट इत्यादी अनेक गोष्टींचा वापर करतात. मात्र तरीसुद्धा केसांची खराब झालेली गुणवत्ता सुधारत नाही. केसांची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यासाठी कोणत्याही केमिकलयुक्त प्रॉडक्टचा वापर करण्याऐवजी घरगुती पदार्थांचा वापर करून केसांची खराब झालेली गुणवत्ता सुधारावी. वातावरणात सतत होणाऱ्या बदलांमुळे केस अतिशय कोरडे आणि निस्तेज होऊन जातात. अचानक केस तुटणे, सतत केस गळणे, केसांमध्ये कोंडा होणे इत्यादी अनेक गंभीर समस्या उद्भवण्याची शक्यता असते. केस कोरडे झाल्यानंतर केसांमध्ये अधिक गुंता वाढू लागतो, ज्यामुळे केस विचरतांना वारंवार तुटू लागतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला केसांमधील कोरडेपणा कमी करण्यासाठी जास्वंदीच्या फुलांचा हेअर मास्क तयार करण्याची सोपी कृती सांगणार आहोत. या पद्धतीने तयार केलेला हेअर मास्क केसांसाठी अतिशय प्रभावी ठरेल. हेअर मास्क तयार करण्याची रेसिपी: साहित्य: जास्वंदीची फुले जास्वदींची पाने कोरफड जेल बदाम किंवा नारळाचे तेल दही कृती: मिक्सरच्या भांड्यात जास्वंदीची पाने आणि फुले बारीक वाटून पेस्ट तयार करा. तयार केलेली पेस्ट वाटीमध्ये काढून घ्या. त्यानंतर त्यात कोरफड जेल आणि नारळाचे तेल टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. सगळ्यात शेवटी तयार केलेल्या मिश्रणात दही टाकून पुन्हा एकदा मिक्स करा. तयार करून घेतलेला जास्वदींचा हेअरमास्क केसांच्या मुळांपासून ते अगदी टोकांपर्यंत लावून ठेवा. त्यानंतर पाण्याने केस स्वच्छ धुवून घ्या.



पावसाळ्यात हेअर मास्क वापरण्याचे फायदे: जास्वंदीची पाने आणि फुले केसांसाठी अतिशय महत्वाची आहेत. यामुळे केसांना योग्य पोषण मिळते. त्यामुळे जास्वंदीच्या पानांचा आणि फुलांचा वापर केसांच्या वाढीसाठी करावा. कोरफड जेल केस आतून स्वच्छ करण्यासाठी मदत करतात. यामुळे तुमचे केस मॉइश्चराइज होऊ मऊ आणि चमकदार दिसू लागतील. खोबऱ्याच्या तेलात असलेल्या गुणधर्मांमुळे केसांची वाढ निरोगी होते. केसांमधील कोंडा कमी करण्यासाठी दह्याचा वापर करावा.

# युद्धकाळात देशाचा प्रत्येक नागरिक हा सैनिक असतो..! – समाजभूषण : उत्तमराव तरकसे

बीड / प्रतिनिधी :– बीड जिल्हा तालुका धारूर मधील असरडोह येथील ग्रामपंचायत समोरील प्रांगणातील सभागृहात अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला सदर सोहळ्यास अतिथी म्हणून आवर्जून समाजभूषण उत्तमराव दासु तरकसे (महाराष्ट्र शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत ), प्रा. ईश्वर मुंडे (राष्ट्रवादी काँग्रेस नेते), माऊली तात्या गडदे (ज्येष्ठ नेते), रविकिरण देशमुख (मा सरपंच आसरडोह), (धारूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक) श्री देविदास वाघमोडे, ऐड. दत्ता काचगुंडे, (मा.चेअरमन) गोविंद शिंदे असे मान्यवर विचार मंचावर उपस्थित होते सर्व मान्यवरांनी आपले विचार मांडले तसेच समाजभूषण उत्तमराव तरकसे यांनी आपले विचार मांडताना ✻युद्धकालीन परिस्थितीमध्ये देशाच्या सीमेवर सैनिक लढत असले तरी देशांतर्गत



युद्धकाळात देशातील प्रत्येक सामान्य नागरिक हा सैनिक असतो त्याचे लढायचे स्वरूप मात्र वेगळे असते✻ असे मोलाचे विचार मांडले, सदर कार्यक्रमात नवनिर्वाचित प्रशासकीय सेवेत नव्याने रुजू झालेल्या तसेच दहावी – बारावी व नीट जीट पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान उपस्थित सन्माननीयांच्या हस्ते करण्यात आला तसेच सदर कार्यक्रमात प्रशासकीय कार्य प्रभावीपणे करणाऱ्या प्रशासकाला प्रतिवर्षी सदर समितीच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्कृष्ट प्रशासक पुरस्कार देण्याचे ठरविण्यात आले असून प्रथम पुरस्कार धारूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक : देविदास वाघमोडे यांना देण्याचे सर्वानुमते ठरले आसे प्रा. ईश्वर मुंडे यांनी जाहीर केले असुन लवकरच मान्यवराच्या हस्ते सन्मानित करण्यात येईल,

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश पिंगळे यांनी खूप उत्कृष्टपणे सादर केले कार्यक्रमास तडीस नेण्याकरिता महेश बेटे, संदीप काजगुंडे, रणजीत राठोड, गणेश पिंगळे, विष्णू शिंदे, संतोष काजगोंडे, आकाश शिंदे, अंगद पिंगळे, विनायक गडदे, यशवंत धायगुडे, रमेश काजगुंडे, आनंद खडके, पांडुरंग काजगुंडे, बाबुराव देवकते, संतोष झारगड, प्रकाश काजगुंडे यांनी खूप परिश्रम घेतले व कार्यक्रमाचे शोभा वाढवली तसे कार्यक्रमास आसरडोह नगरीतले सर्व नागरिक व आसपासच्या परिसरातील नागरिकांनी खूप मोठ्या संख्येने उपस्थिती लावली

# चीन-अमेरिका टॅरिफ वॉर चिघळला; व्यापार रखडला



बिजींग : वृत्तसंस्था जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिका आणि चीन यांच्यातील वाद दिवसेंदिवस चिघळत चालला आहे. चीनमधून अमेरिकेत जाणा–या जहाजांची संख्या सातत्यानं कमी होतेय. गेल्या १५ दिवसांत हा आकडा फेब्रुवारीनंतरच्या नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. एप्रिलच्या मध्यापासून त्यात ५० टक्क्यांची घसरण झाली. अमेरिकी अर्थमंत्र्यांनी, चीन रेअर अर्थ सारख्याचा पुरवठा थांबवत असल्याचं म्हटलं. चीननं अमेरिकेसोबत केलेल्या कराराचं पूर्णपणे उल्लंघन केल्याचं यापूर्वी ट्रम्प म्हणाले होते. ट्रुथ सोशलवरील पोस्टमध्ये ट्रम्प यांनी, चीनला अत्यंत वाईट परिस्थितीपासून वाचवण्यासाठी घाईघाईत करार केला. 'मिस्टर नाइस गाय' बनण्याचा हा परिणाम असल्याचंही ते म्हणाले. काही आठवड्यांपूर्वी जिनिव्हा येथे दोन्ही देशांनी एक करार केला होता. याअंतर्गत दोन्ही देशांनी एप्रिलमध्ये एकमेकांवर लादलेलं शुल्क कमी केलं होतं. ही व्यवस्था ९० दिवसांची होती. पण आता दोन्ही पक्ष एकमेकांवर कराराच्या भावनेच्या विरोधात काम करत असल्याचा आरोप करत असल्यानं हा करार तुटण्याच्या मार्गावर आहे. दोन्ही बाजूंमधील चर्चा रखडल्याचं अमेरिकी अधिका–यांचं म्हणणं आहे. वाटाघाटींच्या प्रगतीसाठी ट्रम्प आणि चीनचे नेते शी जिनपिंग यांचा सहभाग आवश्यक असल्याचं त्यांनी म्हटलं. अमेरिकेचा आरोप आहे की, चीननं रेअर अर्थ आणि संबंधित उत्पादनांची निर्यात थांबवली आहे.

# शेतकऱ्यांना खते व बि-बियाणांचा पुरवठा वेळेत उपलब्ध करुन द्या : माजी मंत्री आ.संजय बनसोडे

उदगीर/प्रतिनिधी : जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांची कृषी विभागाने काळजी घेवुन जबाबदारीने त्यांना खते व बी – बियाणांचा पुरवठा करावा. खतांचा साठा, बियाणांचे प्रमाण याची खात्री करुन घ्यावी. पेरणीच्या वेळी खतांचा तुटवडा भासणार नाही याची काळजी घेवुन संबंधित कृषी सेवा केंद्राच्या बाहेर खते व बियाणांची माहिती फलक लावुन शेतकऱ्यांना खते व बि-बियाणांचा पुरवठा वेळेत उपलब्ध करुन द्या अशा सुचना माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी अधिका–यांना दिल्या.



ते उदगीर येथील तहसील कार्यालयातील तालुका स्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीत बोलत होते.

यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शिवसांब लाडके, जिल्हा कृषी अधिकारी सुटे, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे,जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदिप काळे, उपविभागीय कृषी अधिकारी श्रेयश यादव, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, जळकोटचे गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, उदगीर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी, शहरचे पोलीस निरीक्षक दिलीप गाडे, जळकोटचे तहसिलदार राजेश लांडगे, श्याम डावळे, बालाजी भोसले, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, परवाच्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या भागाचे प्रशानाच्या वतीने पंचनामे करण्यात आले असुन शासन दरबारी त्याचा पाठपुरावा करुन शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. मतदार संघातील रस्ते, वीज, पाणी आदी योजनांचा आढावा यावेळी आ.संजय बनसोडे यांनी घेतला. भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करुन वाटरग्रीड ही महत्वकांशी योजना केवळ उदगीर मतदार संघात असुन यामध्ये समाविष्ट असलेल्या गावांना याचा फायदा होणार आहे. मतदार संघातील समस्या सोडवण्याकरीता आता महिन्याला जनता दरबार घेवुन सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवणार आहे. महाविस्तार ॲपचे शेतकरी बांधवांना कृषी विभागाच्या वतीने मार्गदर्शन करुन त्यांना माहिती द्यावी. विश्वशांती बुध्द विहाराच्या माध्यमातून उदगीरचे नाव जगामध्ये गेले आहे. त्यामुळे कालच्या एमपीएस सी मध्ये ४७ नंबरला आपल्या उदगीरचा प्रश्न विचारला गेला ही समस्त मतदार संघासाठी अभिमानाची गोष्ट आहे असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी प्रशासनातील विविध विभागाचे अधिकारी, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार उपस्थित होते.

# उच्च क्षमतेचे सक्षन आणि जेटिंग मशीन मनपाच्या ताफ्यात भूमिगत गटार व मल संकलन केंद्राची स्वच्छता होणार सोपी



लातूर/ प्रतिनिधी: भूमिगत गटार व मल संकलन केंद्राची स्वच्छता करणारे उच्च क्षमतेचे सक्षन आणि जेटिंग मशीन मनपाच्या ताफ्यात दाखल झाले आहे. मनुष्यबळाच्या आरोग्य सुरक्षिततेसह पाण्याचा पुनर्वापर करण्याची सुविधा या मशीनमध्ये उपलब्ध आहे.यंत्र संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,नवी मुंबई यांच्यामार्फत लातूर मनपाला हे मशीन देण्यात आले आहे. मनपा आयुक्त देविदास जाधव यांच्या हस्ते सोमवार दि. २ जून रोजी या मशीनचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त कैलास केंद्रे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.




या मशीनच्या माध्यमातून मनपा क्षेत्रातील भूमिगत गटार मल संकलन केंद्राची स्वच्छता करणे सोयीचे होणार आहे.भूमिगत नाल्यातील ब्लॉक क्रॉसिंग पाईपची स्वच्छताही सोपी होणार आहे. शहरातील स्वच्छतेच्या कामात या मशीनचा फायदा होणार आहे. आपत्कालीन काळात आवश्यक असणाऱ्या ठिकाणी मशीनचा वापर करून तक्रारींचे निवारण करता येणार आहे. आपत्तीच्या काळात नागरिकांनी मुख्य स्वच्छता निरीक्षक शिवराज शिंदे ( ८८८८२२८३०६ ) यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

# होय, आमचं चुकलं, लाडकी बहीण योजनेबाबत अजित पवारांची कबुली; संजय राऊतांचा राजीनाम्याचा आग्रह

महाराष्ट्र सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील अपात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणांवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्टपणे कबुली दिली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीत काही चुका झाल्या आहेत. या योजनेअंतर्गत २,२८९ सरकारी कर्मचाऱ्यांनी अपात्र असूनही लाभ घेतल्याचे उघड झाले आहे, अशी कबुली अजित पवार यांनी दिली आहे. या अपात्र लाभार्थ्यांकडून आधीच वितरित केलेला निधी परत घेतला जाणार नाही, परंतु भविष्यातील लाभ फक्त पात्र महिलांनाच दिला जाईल, असंही अजित पवारांनी यावेळी स्पष्ट केलं. या प्रकरणावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी म्हटले आहे की, जर अजित पवार यांनी अपात्र महिलांना लाभ दिला असल्याचे मान्य केले आहे, तर त्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. राऊत यांनी सरकारवर आरोप केला की, निवडणुकीपूर्वी मतांसाठी ही योजना राबवण्यात आली आणि त्यात अपात्र लाभार्थ्यांना समाविष्ट करण्यात आले. दरम्यान, या योजनेच्या निधीवाटपाबाबतही वाद निर्माण झाला आहे. महाराष्ट्र सरकारच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, डिसेंबर २०२४ पर्यंत या योजनेवर १७,५०६ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या योजनेसाठी अनुसूचित जाती-जमाती आणि सामाजिक न्याय विभागांच्या निधीतून रक्कम वळवण्यात आल्याचा आरोप सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केला आहे .

# रायगडावरील शिवराज्याभिषेक सोहळ्यास ६ जूनला जिल्ह्यातील शिवभक्तांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे – सतीश करंडे



लातूर :– अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने येत्या ६ जून रोजी रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा साजरा होणार असून यंदाचा सोहळा मोठ्या दिमाखात, शिस्तबद्ध आणि जल्लोषात पार पडणार आहे. या सोहळ्यात लातूर जिल्ह्यातील हजारोच्या संख्येने शिवभक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन आज दिनांक २ जून रोजी पत्रकार परिषदेत बोलताना अखिल भारतीय शिवजन्मोत्सव समितीचे सतीश राजेंद्र करंडे यांनी केले आहे.


शिवराज्याभिषेक सोहळ्यात ६ जून रोजी 'लोकोत्सव' 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहीरांचा स्वराज्याच्या इतिहासाचा' व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा', मुख्य आकर्षण ठरणार असून ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षिदार व्हावे असेही त्यांनी पत्रकार परिषद बोलताना सांगितले.

'राज्याभिषेक' शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाचे सुवर्णपान असून यवनी सत्तांच्या अत्याचारातून महाराष्ट्रभूमीला स्वातंत्र्याचा हुंकार देणार हा क्षण शिवरायांच्या प्रेरणेने मर्द मराठ्यांच्या तलवारी याच मातीत तळपल्या आणि स्वराज्याचे स्वप्न साकार झाले. हजारो मावळ्यांच्या, सर्वसामान्यांच्या बलिदानातून महाराष्ट्रभूमी पावन झाली. दुर्गराज रायगडावर शिवरायांचा ६ जून १६७४ ला 'राज्याभिषेक' झाला. मोठ्या थाटामाटात राज्याभिषेकाचा सोहळा पार पडला अन् सार्वभौम राज्य स्थापन झाल्याची दाहीदिशा फिरली. या ऐतिहासिक क्षणाची स्मृती सदैव राहावी, या हेतूने प्रतिवर्षी ६ जून रोजी दुर्गराज रायगडावर भव्य प्रमाणात शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. त्याप्रमाणे याही वर्षी शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या दिमाखात साजरा होणार आहे.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती तर्फे दुर्गराज रायगडावर ५ व ६ जून २०२५ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होणार असल्याचे त्यांनी सांगितले या पत्रकार परिषदेस सतीश करंडे, प्रसाद कांबळे, कुमार खोत, अमृता कांबळे आदींची उपस्थिती होती.

# ज्वेल ऑफ नवी मुंबई पार्क येथे तथागत भगवान गौतम बुद्धांच्या भव्यदिव्य मूर्तीचे काम अंतिम टप्प्यात

नवी मुंबई / के. एच. हनवते :– नवी मुंबई शहर हे २१व्या शतकातील ग्रीन सिटी म्हणून एक नंबरचा बहुमान नवलौकिक आहे आणि अशा या निसर्गरम्य पार्कमध्ये तथागत भगवान गौतम बुद्धांची भव्यदिव्य मूर्ती उभारण्यात येत असुन या शानदार उद्घाटन सोहळ्याची सर्वांनाच उत्सुकता लागलेली आहे, नवी मुंबईतील सर्व बौद्ध-आंबेडकरी जनतेला आनंदाची बातमी आहे, अडीच हजार वर्षांपूर्वी तथागत भगवान गौतम बुद्धांने या भुतलावरील सर्व मनुष्य, पशु-प्राणी आणि निसर्गावर ✻प्रेम, मैत्री, करूणेने साऱ्या विश्वाला शांतीचा संदेश दिला, दुःख मुक्तीचा मार्ग दाखविला✻ अशे महान युगपुरुष : महाकारुणीक तथागत भगवान गौतम



बुद्धांच्या या भव्यदिव्य मूर्तीमुळे सर्व नवी मुंबईकरांची मान गर्वाने उंचावेल, आणि या निसर्गरम्य पार्कमधे तथागत भगवान गौतम बुद्धांच्या मुर्तीमुळे २१ व्या शतकातील नवी मुंबई ग्रीन सिटीला आजुन चार चांद लागतील..! हे एक ऐतिहासिक कार्य बेलापूर विधानसभेच्या विद्यमान कार्यसम्राट आमदार : मान. मंदाताई म्हात्रे आणि नवी मुंबई समाज सेवक : मान. महेश खरे यांच्या अथक प्रयत्नातून साकार होत आहे.

भवंतू सब्बमंगलम ! सबका कल्याण हो..!! नमो बुध्दाय ! सविनय क्रांतिकारी... नीला भडक जय भीम कडक.

# भरती रजिस्ट्रेशन कॅम्प आयोजित करण्याबाबतचे पत्र बनावट

## लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाचे स्पष्टीकरण

लातूर :– बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी ड्खड खपवळर श्रळाळींशव या नावाच्या खासगी कंपनीमार्फत क्षेत्रीय स्तरावर भरती रजिस्ट्रेशन कॅम्प आयोजित करण्यात येत असल्याबाबतचे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र व्हायरल झाले आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या डिजिटल स्वाक्षरीने हे पत्र निर्गमित झाल्याचे भासविण्यात आले असून हे पत्र बनावट आहे. भरती रजिस्ट्रेशन कॅम्प आयोजित करण्याबाबत लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कोणतेही पत्र निर्गमित करण्यात आलेले नाही, असे स्पष्टीकरण जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आले आहे.

या पत्रात सुशिक्षित बेरोजगारांना सुरक्षा क्षेत्रातील प्रशिक्षण मिळून त्यांना कायमस्वरूपी रोजगार मिळवा, यासाठी एका खासगी कंपनीद्वारे राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये भरती रजिस्ट्रेशन कॅम्प आयोजित करण्यात येत आहे. यामाध्यमातून नामांकित कंपन्यांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यासाठी ऑनलाईन शुल्क घेतले जाणार असल्याचे नमूद करण्यात आले होते. हे पत्र लातूर जिल्हाधिकाऱ्यांच्या डिजिटल स्वाक्षरीने व क्रमांक दंड/०५/कावि/४०८८१७३/२०२५, दिनांक २८/०५/२०२५ अन्वये जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी यांना निर्गमित करण्यात आल्याचे भासवण्यात आले होते. मात्र, अशा प्रकारे कोणतेही पत्र लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात आलेले नाही, स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अशा बनावट व फसवणुकीच्या प्रकारापासून सर्वांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE